# ‘शेतसरी’ : दारिद्र्याने पिचलेल्या ग्रामीण समाजाचे चित्रण

**प्रा. (डॉ.) आळवेकर एकनाथ**
प्रमुख, मराठी विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)
संपर्क – ९४२३२८३७०३

द. तु. पाटील हे मराठीतील महत्त्वाचे ग्रामीण लेखक असून त्यांचा ‘शेतसरी’ हा कथासंग्रह मौज प्रकाशन गृह, मुंबई यांनी प्रकाशित केला आहे. ग्राम जीवनातील यात्रा या विषयावरील त्यांची मौज प्रकाशनाची ‘चैत’ ही कादंबरी अत्यंत गाजलेली आहे. द. तु. पाटील यांची ही दुसरी कलाकृती असून ग्राम जीवनाचे नाविन्यपूर्ण दर्शन या कलाकृतीतून घडविले आहे. द. तु. पाटील यांनी शेती हे मध्यवर्ती सूत्र ठेवून आधुनिक जीवनात शेतीसंबंधी निर्माण झालेले प्रश्न, तरुणांमधील व्यसनाधिनता, अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या समस्या, दारिद्र्य, खेड्यातील अंधश्रद्धा, माणुसकी अशी आशयसूत्रे घेऊन या सर्व कथा येतात. ग्रामीण स्त्रीचे दु:ख, तिची हतबलता काही कथातून आली असली तरी दारिद्र्याचा आणि आलेल्या संकटांचा खंबीरपणे सामना करणारी स्त्रीसुद्धा या कथांतून आढळते.

‘तड’, ‘रोशनाई’, ‘उठवणी’, ‘शेतसरी’ या कथांतून प्रामुख्याने शेतीसंबंधी प्रश्न मांडले आहेत. ‘तड’, ‘झेलण्यातनं गेलेला दत्ता’, ‘चढता वेल’, ‘भय’ या कथांतून व्यसनाधीनतेमुळे वाया गेलेली तरुण पिढी आणि त्यांच्या वाट्याला आलेले दु:ख याबद्दलचे चित्रण येते. अल्पभूधारक आणि दारिद्र्याशी सामना करणाऱ्या शेतकरी आणि शेतमजुरांचे प्रश्न ‘झेलण्यातनं गेलेला दत्ता’, ‘रोशनाई’, ‘उठवणी’, ‘भय’ या कथांतून मांडले आहेत. ‘चढता वेल’ या कथेतील शोकांतिका वाचकाला हालवून सोडते.

‘तड’ या कथेतून द. तु. पाटील यांनी शेती ही बेभरवशाची झाली असून मजूर न मिळणे ही आताच्या शेतीधंद्याची मोठी समस्या असल्याचे कथेतून जाणवते. ‘झेलण्यातनं गेलेला दत्ता’ या कथेतून खेड्यातले व्यसनाच्या आहारी गेलेले तरुण, त्यातून त्यांचे गंभीर आजारपण, त्यांच्या मृत्यूमुळे कुटुंब निराधार होणे या बाबी मांडल्या आहेत. मुला-मुलींच्या लग्नाचा प्रश्नही मांडला आहे. ‘चढता वेल’ ही महाभयंकर अशा एडस् या रोगाच्या भयाची आणि परिणामाची कथा आहे. खेड्यातील अशिक्षित, अर्धशिक्षित तरुण वाढत्या वयात शारीरिक सुखासाठी बाहेरख्याली होतात. त्यात संपूर्ण कुटुंब होरपळून जाते आणि शोकांतिका होते.

‘भय’ या कथेतून दारिद्र्य, व्यसन, व्यसनातून निर्माण होणारे आजारपण यासंबंधी वास्तव मांडणी केली आहे. दारिद्र्यात जगणाऱ्या खेड्यातील कुटुंबाची विशेषत: कथेतील स्त्रीची होणारी ससेहोलपट कथेतून पाहायला मिळते. आजारपण हे मृत्युपर्यंत नेऊ शकते अशा प्रकाराची भीती कोणत्याही माणसांमध्ये असते. ‘उठवणी’ या कथेत शेतकऱ्यासाठी पशुधन त्याच्या उदरनिर्वाहाचे साधन असू शकते मात्र पशुधन सांभाळताना अचानक आपत्ती आली तर मात्र शेतकऱ्याच्या ठिकाणी अस्वस्थता निर्माण होते. ‘रोशनाई’ या कथेत शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरील खरे समाधान चांगली शेती पिकून त्यातून चांगले उत्पन्न आले तर पाहायला मिळते. ‘शेतसरी’ या कथेत शेतसरीमध्ये कष्ट करून शेती पिकवणे, ती शेतसरी वाचवणे यासाठी जुन्या पिढीचा संघर्ष पाहायला मिळतो. शेतसरी ही शेतकऱ्याचे भाग्य उजळणारी खाण असते. निसर्गावर अवलंबून असणारी शेती पिकली तर वर्षभर त्यातील उत्पन्न म्हणून मिळालेल्या धान्यातून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

**थोडक्यात**

‘शेतसरी’ या कथासंग्रहातील कथांची पुढीलप्रमाणे वैशिष्ट्ये जाणवतात. व्यसनी नवऱ्यासोबत संसार करणे स्त्रीला किती कष्टदायक असते, याचे चित्रण येते. व्यसनाधीनता आणि दारिद्र्य यामुळे कुटुंबाची होणारी शोकांतिका. व्यभिचाराकडे वळलेली तरुण पिढी स्वतःचे आयुष्य स्वतः संपवताना आढळते. पशुधनावर उपजीविका करणाऱ्या शेतकऱ्यांची कथा यामध्ये आहे. शेती ह्याच प्रमुख व्यवसायावर अवलंबून असणारा शेतकरी केवळ निसर्गावर अवलंबून असतो, याचे वास्तव मांडले आहे. शेतसरी वाचविण्यासाठीची जुन्या पिढीची तळमळ, शेती टिकली तरच समस्त समाजाची भूक भागू शकते, हे वास्तव मांडले आहे. कोल्हापुरी बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचा वापर कथांतून केला आहे.

**शेतसरी (कथासंग्रह) – द. तु. पाटील**
मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०२४
पृष्ठे १९५